RIGHT TO INFORMATION
सूचना का अधिकार

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**

**कोकण भवन, सहावा मजला, नवी मुंबई ४०० ६१४.**

☎/ 🖷:-०२२,२७५७१३९१. Website:www.mahalfa.in E.Mail:ad.admin@mahalfa.in

क्र. स्था १८/ब/बाहययंत्रणा/कंत्राटी कर्मचारी /न.क्र.६०(५)/आस्था-५/ ३८४ . दिनांक:- 22 FEB 2018

## परिपत्रक

विषय :- बाह्ययंत्रणेद्वारे वाहनचालकांच्या सेवा घेण्याबाबत

संदर्भ :- शासन पत्र वित्त विभाग क्र. सेवाप्र-२०१६/ प्र.क्र.४६/कोषा प्रशा-३, दि.०३.०१.२०१८

उपरोक्त संदर्भाकित शासन पत्रान्वये स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनस्त ज्या कार्यालयातील बाह्ययंत्रणेने कंत्राटी तत्वावर वाहनचालकांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्यात आल्याच्या कंत्राटाची मुदत दिनांक ३१/०३/२०१८ नंतर संपुष्टात येणार आहे अशा कार्यालयप्रमुखांनी मुदतवाढीचे प्रस्ताव पाठविण्याऐवजी नव्याने निविदाप्रकिया राबवून नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत व न्युनतम दराच्या निविदा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्याचे शासनाचे निर्देश आहेत. त्याअनुषंगाने प्रस्ताव शासन मान्यतेसाठी या संचालनालयास पाठविण्यात यावे.

**सदर प्रस्ताव पाठविताना खालील सूचनांचे पालन करावे.**

१) बाह्ययंत्रणेने प्रस्ताव पाठविताना जुने कंत्राट संपुष्टात येण्याआधी चार महिन्यांपूर्वी कार्यवाही सुरु करण्यात यावी. जुने कंत्राट संपुष्टात येण्याआधी किमान तीन महिने कंत्राटी वाहनचालक नेमण्यासाठी प्रस्ताव या संचालनालयास प्राप्त होईल असे पहावे.

२) त्यानंतर नवीन वाहनचालक नेमण्यासाठी दरपत्रके / निविदा ही कार्यवाही सुरू करण्यात यावी. जुने कंत्राट संपण्यापूर्वी किमान ४५ दिवस आधी किमान दराचे दरपत्रक मंजूर करण्यासाठी प्रस्ताव संचालनायास सादर करावे.

३) सर्व प्रस्ताव योग्य मार्गाने म्हणजेच प्रादेशिक सह संचालक कार्यालयांमार्फतच पाठवावे.

४) प्रस्ताव तुलनात्मक तक्त्यासह परिपूर्ण पणे पाठविण्यात यावा. तसेच शासन निर्णय वित्त विभाग दिनांक ०२/१२/२०१३ मधील सूचनांच्या आधारे विहित विरणपत्रासह सादर करावा.

५) डिसेंबर २०१७ नंतर संपुष्टात आलेल्या कंत्राटास मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात येऊ नयेत.

६) कार्योत्तर मंजूरीचे प्रस्ताव पाठविण्यात येऊ नयेत.

(शुभांगी पाटोळे)
सह संचालक (प्रशासन),
स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,
नवी मुंबई.

प्रति,

१) सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण/ पुणे / नाशिक/ औरंगाबाद/अमरावती/ नागपूर.

२) सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सर्व जिल्हे.(सर्व जिल्हे)

Harshada/HCL/ESB-५/out sourcing/१७.१०.२०१७